# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.

www.dvet.gov.in e-mail: : desk७@dvet.gov.in Fax-२२६५९२३५/२२६७५६२८ Phone No. २२६२०६०४/२९३.


क्र. ७/सीटीएस /प्रशिक्षण/ २०१७/ ६८१

दिनांक- १३/१२/२०१७

प्रति,
सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.

विषय :- भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई (IIT Bombay) यांचेमार्फत Spoken Tutorial Project (ST) चे उपलब्ध् दृकश्राव्य माध्यमातील प्रशिक्षणाबाबत

संदर्भ :- १) संचालनालयाचे पत्र क्र.०७/सीटीएस/प्रशिक्षण/२०१७/५३७, दि.७/१०/२०१७
२) IIT Bombay यांचा दिनांक ०८/१२/२०१७ रोजीचा ईमेल

वरील विषयास अनुसरुन आपणास सूचित करण्यात येते की, भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचेमार्फत Spoken Tutorial Programme सुरु करण्यात आला आहे. सदर प्रकल्प हा मानव संसाधन मंत्रालय, भारत सरकार व भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचा संयुक्त उपक्रम असून त्यांचे www.spoken-tutorial.org या संकेतस्थळावर सदर प्रकल्पांतर्गत विविध प्रकारचे कोर्सेस दृकश्राव्य माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तसेच औ.प्र.संस्थेतील तज्ञ व अनुभवी निदेशकांना नियुक्त करुन प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण उपलब्ध करुन देणेबाबत संचालनालयाचे संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते.

तथापि, IIT Bombay यांचा दिनांक ८/१२/२०१७ रोजीचा ईमेल व मा. उपसंचालक व सहाय्यक संचालक यांचेशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत सदर प्रकरणी फक्त २५ संस्थांनी IIT Bombay यांचेशी संपर्क साधलेला आहे . सदरची बाब ही अत्यंत खेदजनक आहे.

सदर उपक्रमाबाबत आपणांस कळविण्यात येते की,

१) भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचेमार्फत Spoken Tutorial Training Programme चे प्रशिक्षण साहित्य ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध होणार असून प्रशिक्षण पूर्णत: नि:शुल्क आहे. सदरील प्रशिक्षण साहित्य Download करुन प्रशिक्षणासाठी offline वापर करता येईल.

२) सदरचे प्रशिक्षण हे Open Source Technology वर आधारित आहे.

३) कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रॅमिंग टेक्नॉलॉजी (कोपा) व एम्प्लॉयबिलीटी स्कील या विषयाचे अभ्यासक्रम डीजीटी, नवी दिल्ली व निमी, चेन्नई यांचेकडून mapping करण्यात आलेले आहेत.

४) उपरोक्त प्रशिक्षण हे मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषेमध्ये उपलब्ध करुन दिलेले आहेत.

५) कोपा व्यवसाय असणाऱ्या संस्थांमधील संबंधित शिल्प निदेशकांनी सदरील प्रशिक्षण त्यांचे संस्थेत ताबडतोब सुरु करावयाचे आहे.

६) या प्रकल्पांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची चाचणी परीक्षा भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचेमार्फत घेण्यात येणार असून प्रमाणपत्र देखिल भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचेमार्फत देण्यात येणार आहे.

तरी आपणांस पुन:श्च सूचित करण्यात येते की, भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचेमार्फत सुरु करण्यात आलेल्या Spoken Tutorial हया प्रशिक्षण कार्यक्रमाचा शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना लाभ होण्याच्या दृष्टीने Spoken Tutorial Project च्या प्रतिनिधी श्रीमती. नीलम कामठेकर, समन्वयक, (मो.नं.७७०००६२४३४) ईमेल- **neelam78647@gmail.com** यांचेशी संपर्क साधण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना आपल्या स्तरावरुन आदेशित करावे व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(योगेश पाटील)
उपसंचालक

प्रत :-

१) श्री. स्वप्नील मोरे, Training Co-Ordinator, Indian Institute of Technology Bombay, Powai, Mumbai ४०० ०७६.

२) श्रीमती नीलम कामठेकर, समन्वयक, Spoken Tutorial Training Programme, IIT, Bombay

c:\kharat pc\kharat pc data\bhavsar\iit bombay.docx